| आपली सेवा आमचे कर्तव्य — महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क आयोग | राज्य लोकसेवा हक्क आयोग, पुणेविभाग, पुणे. कार्यालयाचापत्ता : ३रामजला, छत्रपतीशिवाजीनगर-घोलेरोडक्षेत्रियकार्यालय, पुणेम.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४ | G20 |
|---|---|---|
| दू.क्र.(०२०)-२९९५०६६३ | ई-मेल- crtspune@maharashtra.gov.in | |


क्र.आस्था-२०२३/रासेहआपु/प्र.क्र६८ /कार्या-२/ ४२२ दि.२५.९.२०२३

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

विषय -:शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

राज्य लोकसेवा हक्क आयोग, पुणे विभाग यांच्या कार्यालया करीता शासकीय सेवेतून गट ब (राजपत्रित / अराजपत्रित) संवर्गातून अधिकारी / कर्मचारी यांची करारपध्दतीने विवक्षित कामासाठी आयोगाच्या कार्यालयात नियुक्ती करण्याबाबत अर्ज मागविण्याकरिता जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे. सदर जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर तातडीने प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

सोबत :- सहपत्र

(अनुराधा खानविलकर)
उप सचिव
राज्य लोकसेवा हक्क आयोग,
पुणे महसुली विभाग पुणे

Scanned with OKEN Scanner

**शासकीय सेवेतून (गट ब राजपत्रित/अराजपत्रित) अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविणेबाबत जाहिरात**

**राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे यांचे कार्यालय**
**३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोल रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४**

---

शासकीय सेवेतून (गट ब राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | वय अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय सेवेतून (गट ब राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गीय शासनाच्या सेवेमधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी | लेखा व अर्थ विषयक बाबी | १.महाराष्ट्र शासनातील कोणत्याही वित्त व लेखा कार्यालयातील सहायक लेखा अधिकारी किंवा त्यावरील वरीष्ठ पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक .<br>२.महाराष्ट्र प्रशासकीय लेखा, वित्त व्यवस्थापन, अर्थसंकल्प संदर्भातील अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वयोमर्यादा:- ५८ ते ६३ वर्ष | १ |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२.करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकिय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३.नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

५. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगाचा राहील. मुलाखतीचा दिनांक अर्जदारांना कळविण्यात येईल.

६. उपरोक्त अटी व शर्तीसोबतच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१२ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.१६.१०.२०२३ पर्यंत खाली नमूद पत्त्यावर सादर करावेत.**

**संपर्क :-** राज्य सेवा हक्क आयोग, पुणे महसुली विभाग, पुणे यांचे कार्यालय , ३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर- घोल रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर पुणे -४११ ००४.

दूरध्वनी :- (०२०) -२९९५०६६३.

ई-मेल :- crtspune@maharashtra.gov.in

(अनुराधा खानविलकर)
उप सचिव
राज्य लोकसेवा हक्क आयोग,
पुणे महसुली विभाग पुणे.

Scanned with OKEN Scanner